# शब्दाई
२०२०-२१

**माजी विद्यार्थी रमेश मोटे लिखित**
**ग्रामीण मातीचा काव्यसुगंध**

कामधेनू सेवाभावी संस्थेचे,

## वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

### कला, विज्ञान व वाणिज्य

ता.अंबाजोगाई,जि.बीड-४३१५१९


**Email** : principalvcg@rediffmail.com
**Website** : www.vasundharacollege.org.in
**Facebook** : vasundharacollege2000@gmail.com
**Youtube** : Creative Vasundhara
**Instagram** : Vasundhara college
**WhatsApp** : **9421342148**
**Cell** : **9822898727**


संपादक

**प्राचार्य, डॉ. अरुण दळवे**

सहसंपादक

**उपप्राचार्य, डॉ.अर्जुन मोरे**

कार्यकारी संपादक

**प्रा.डॉ.संजय खाडप**
**प्रा.मकरंद जोगदंड**
**प्रा.डॉ.बायजा कोटुळे**
**प्रा.डॉ.गजानन सवणे**
**प्रा.नरसिंग उदार**
**श्री.प्रशांत देशमुख**

विद्यार्थी संपादक : कु.अश्विनी कांबळे



# शब्दाई २०२०-२१

**माजी विद्यार्थी रमेश मोटे लिखित**
**ग्रामीण मातीचा काव्यसुगंध**


**प्रकाशन :** जानेवारी २०२२

**प्रकाशक :**
**प्राचार्य,डॉ.अरुण दळवे**
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर

**मुद्रक :**
**जीत प्रकाशन**
विठ्ठल-रूक्मिणी चौक,
आनंद नगर,अंबाजोगाई
मो.९४२२३७७९७२



© **सर्व हक्क संपादकाच्या स्वाधीन**



**अक्षर जुळवणी :** गिरी आर्टस्,अंबाजोगाई
मो.९८८१८८२२२०

**मुखपृष्ठ रेखाटन:** संजय गिरी,अंबाजोगाई

साहित्य संकलन :
डॉ.संजय खाडप, मो.९८२२०३६१७६
प्रा.नरसिंग उदार, मो.९४२१३४७८१४


टीप : 'शब्दाई' या विशेषांकातील सर्व मजकूर संबंधित व्यक्तिचा असून, त्या मजकुराशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.





# संस्थापक सचिवांचे मनोगत

संस्थापक सचिवांचे मनोगत मानवी समूहाचा सर्वांगीण विकास साधला जावा, या उदात्त अशा सकारात्मक दृष्टिकोनातून कामधेनू सेवाभावी संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेच्या या सकारात्मक उद्दिष्टांना वास्तवात उतरविण्याचे महान कार्य गेल्या २१ वर्षापासून वसुंधरा महाविद्यालय अविरतपणे करत आहे. काळानुरूप घडणाऱ्या सर्व घडामोडींचा स्वीकार करून समाजाचा आणि विद्यार्थ्यांचा परिपूर्ण विकास घडवून आणण्यामध्ये महाविद्यालय यापुढेही अविरतपणे अग्रेसर राहणार आहे. महाविद्यालयातील दिशादर्शक असणारे सर्व नवनवीन उपक्रम हे विद्यार्थ्यांना यशस्वी भरारी घेण्यासाठी फार मोठी ऊर्जा केंद्रे ठरली आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी स्वावलंबी बनला पाहिजे, सेवाभाव त्याच्या नसा नसात भिनला पाहिजे. या उद्देशानेच महाविद्यालयाची वाटचाल सतत सुरू असते. हे मी कौतुकाने सांगू इच्छितो.

विद्यार्थी बांधवांनो महाविद्यालयात शिक्षण घेत असताना महाविद्यालयातील घटकांकडून मिळालेली ज्ञानाची शिदोरी आपले जीवन उज्वल केल्याशिवाय राहणार नाही. महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांमध्ये मोठ मोठ्या हुद्दयावर सेवा बजावत आहेत. हीच महाविद्यालयाची सर्वात मोठी कमाई आहे,असे मी मानतो.महाविद्यालयातील सर्व ऊर्जादायी उपक्रमाच्या पाठीमागे संस्था नेहमीच खंबीरपणे उभी राहील, याची शाश्वती मी देतो. कविता या शीर्षकाखाली प्रकाशित होणाऱ्या 'शब्दाई' या विशेषांकातून लाडझरी या छोट्याशा गावातील कविवर्य रमेश मोठे यांच्या सर्वांग सुंदर कवितांचा वाचनरूपाने आपणास आस्वाद घेता येणार आहे.

कविता मनभेद दूर करण्याचे काम करते. कविता मनाला प्रसन्न सातत्याने ठेवत असते. प्रबोधनाचे व मनोरंजनाचे मोठे माध्यम म्हणून कवितेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. 'शब्दाई' या कविता विशेषांकामधील कविता सर्वांगाला स्पर्श करणाऱ्या आहेत, त्यामुळे हा विशेषांक आपल्या सर्वांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरणार आहे.अशा या प्रेरणादायी दीपस्तंभ असलेल्या 'शब्दाई' विशेषांकास माझ्या हार्दिक शुभेच्छा...!

**मा.गोविंद बालासाहेब देशमुख**
संस्थापक सचिव,
कामधेनू सेवाभावी संस्था,घाटनांदूर

# प्राचार्यांचे मनोगत

सन २०२० - २१ या वर्षाचा वसुंधरा महाविद्यालयाचा 'शब्दाई' कविता विशेषांक आपल्यासमोर ठेवताना मला अंतकरणपूर्वक आनंद होतो आहे. साहित्यामधील सर्वश्रेष्ठ प्रकार जर कुठला असेल तर तो कविता आहे. कविता मोजक्या ओळीतून खूप काही व्यक्त करीत असतात.भावना आणि कल्पनांना अभिव्यक्त करणारे एक प्रभावी माध्यम म्हणून कवितांकडे बघितले जाते. कवितांच्या माध्यमातून वास्तव जीवन कळत असते. वस्तुस्थिती आणि मनस्थिती कवितांच्या माध्यमातून करता येत असते.म्हणून वास्तवावर आधारीत भावना, कल्पना यांचा आविष्कार व्हावा, यासाठी यावर्षीचा 'शब्दाई' हा कविता विशेषांक प्रकाशित करीत आहोत.

कविता संवेदनशीलतेची जाणीव करून देण्यासाठी मोलाचे कार्य करीत असतात. कविताही निर्जीव वस्तूत असलेल्या सजीवतेची जाणीव करून देते. त्या जाणिवेतून आपण निर्जीव वस्तूबाबत जागृत होतोच, परंतु सजीव घटकाबद्दलही तितकाच विचार करू कवितांचा आशय समभाव व सेवाभाव प्रेमभाव यावर मोठ्या प्रमाणात आधारीत असतो. महाविद्यालयाच्या 'शब्दाई' या कविता विशेषांकांत माजी विद्यार्थी मौजे लाडझरी येथील नामांकित कविवर्य मा.रमेश मोटे यांच्या सर्वांगाना स्पर्श करणाऱ्या कविता रेखाटल्या आहेत. त्यामुळे 'शब्दाई' हा विशेषांक सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरणारा आहे. महाविद्यालय सतत प्रगतिशील राहण्यासाठी महाविद्यालयातील नाविन्यपूर्ण उपक्रम हे विद्यार्थ्यांना स्वावलंबनाची गुरुकिल्लीच ठरले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने संगणकीकृत ग्रंथालय, स्पर्धा परीक्षा केंद्र, इंटरनेट सेवा, सांस्कृतिक विभाग, महिला तक्रार निवारण समिती, खुले लोककला महोत्सव, वाद विवाद स्पर्धा, सुसज्ज क्रीडा विभाग, आजीवन शिक्षण विस्तार सेवा केंद्र, अंतर्गत विविध कोर्सेस सुरू आहेत.

सामाजिक बांधिलकी म्हणून महाविद्यालयाच्या स्नेह संमेलनामध्ये गरीब व होतकरू मुलांच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे दरवर्षी आयोजन, विविध उपक्रमांनी अनेक विद्यार्थी घडविले आहेत. ते मोठ मोठ्या पदावर विराजमान झाले आहेत. नैतिक मूल्यांना प्राधान्य देऊन त्यांचे विद्यार्थ्यांमध्ये रुजवन करण्याचे महान कार्य महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांच्या माध्यमातून अविरतपणे सुरूच आहे. विद्यार्थ्याने साहित्य क्षेत्रात आपला नावलौकिक करावा व त्यास व्यासपीठ उपलब्ध व्हावे, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून महाविद्यालयाचा **'शब्दाई कविता विशेषांक'** प्रकाशित होत आहे, याचा मला अभिमान आहे महाविद्यालयाच्या या यशामध्ये विद्यार्थ्यांबरोबरच माजी विद्यार्थी व पालक यांचा सुद्धा सिंहाचा वाटा आहे. म्हणून आपले सहकार्य हाच आमच्या महाविद्यालयाचा विकास असे समीकरण निर्माण झाले आहे. आपल्या कडून सहकार्याची अपेक्षा बाळगतो...!.


**डॉ.अरुण दळवे**
प्राचार्य,
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर




# संपादकीय...

सन २०२०- २१ या वर्षातील वसुंधरा महाविद्यालयाने अधोरेखित केलेला हा 'कविता विशेषांक' वाचकांसाठी फार मोठी पर्वणीच आहे. सर्वांसाठीच प्रेरणेचे दीपस्तंभ म्हणून नावलौकिकास पात्र असलेला 'शब्दाई' हा विशेषांक आपल्यासमोर ठेवताना अंतकरण पूर्वक  आनंद होतो आहे. जशी झाडाला पाण्याची गरज असते, तशी मानवी मनाला सुंदर अशा कवितेतील भावार्थाची गरज असते.बहुतांश कविता ह्या व्यक्तीच्या मनासाठी प्रेरणादायक असतात. कविता ह्या कमी शब्दांमध्ये आपल्याला खूप काही सांगून जातात,ज्या की आपल्या जीवनाला अधिक ऊर्जावान बनवितात.

जीवन जगत असताना येणारे प्रसंग.संघर्ष. सुख. दुःख  अशा सर्वच घटकांना कवींनी कवितांच्या माध्यमातून समाजासमोर आणले आहे. असे म्हटले जाते की, घर छोटं असलं तरी चालेल पण मन मोठ असल पाहिजे. मनाला मोठे बनविण्याचे कार्य सुद्धा प्रेरणादायी व आदर्शदायी कवितांच्या माध्यमातून  असते म्हणून वसुंधरा महाविद्यालयाचा शब्दाई हा विशेषांक कवितेच्या रूपाने आम्ही प्रकाशित करत आहोत.

'शब्दाई' या विशेषांकामध्ये घाटनांदूरपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असणाऱ्या लाडझरी या गावचे  नामांकित कवी  व वसुंधरा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मा.रमेश मोटे यांच्या प्रेरणादायी व सर्वांगाना स्पर्श करणाऱ्या कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत.या कवितांच्या माध्यमातून वाचकांना जाणीव बोध झाल्याशिवाय राहणार नाही. या विशेषांकात कविवर्य मा.रमेश मोटे यांनी आपल्या कविता प्रकाशित करण्यास अनुमती दर्शवून सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार...!

**संपादकीय मंडळ**
वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर
ता.अंबाजोगाई, जि.बीड

# नवी उमेद घेऊन जगणारा कवी

आधुनिक मराठी कविता अनेक वाटा-वळणांनी प्रवास करीत आज एका नव्या टप्प्यावर येऊन थांबली आहे. नवा अविष्कार मांडणारी ही कविता जगाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावते. मानवी जीवनातील वास्तव चित्र संवेदनशिलतेने रेखाटताना हृदयाला हेलावून टाकते. खाऊजाने माणसाच्या जगण्याचे सारे संदर्भच बदलून टाकले. अशावेळी जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या रेट्यात सापडलेल्या सर्वसामान्य माणसाला निराशेच्या गर्तेतून बाहेर काढणे आवश्यक आहे. मोबाईलच्या मोहात अडकलेल्या तरुणांना आपल्या अवती-भोवती वावर असलेल्या माणसांचे सुख-दुःखाची जाणिव झाली पाहिजे. मोबाईलच्या मोहपाशातून मुक्त होऊन आपल्या भोवतीच्या जगाकडे तटस्थवृत्तीने पाहता आले पाहिजे. धकाधक्कीच्या युगात जीवनाचे गणित सोडविताना माणसाची दमछाक होत आहे. प्रश्नाचे मोहोळ घोंगावत आहे. प्रश्नाच्या गराड्यात सापडून गुदमरलेल्या माणसाच चित्र झुम करुन दाखविता व अनुभवता आले पाहिजे. मोबाईल पेक्षा माय-माती, गाव-शिवाराचं मनोहर दर्शन घडविणारी पुस्तकं हाती आली तर गाव-शिवार आनंदाने डोलायला लागेल.

कदाचित हाच आशावाद बाळगीत हातात पुस्तक आणि डोक्यात गाव-शिवार घेऊन माणसाचे गाणे गाणारा रमेश मोटे सारखा कवी मनाला भावून जातो. लाडझरीसारख्या चार-पाचशे घरांची वस्ती असलेल्या खेड्यात रमेशचं बालपण गेलं. बालपणी कौटुंबिक पातळीवर झालेले संस्कार, मित्र, गुरुजी आणि गाव यांचा सहवास कवीमनाला हळूवार गोंजारत गेला. अलिकडे व्यवसायाच्या निमित्ताने गावोगाव फिरताना अनेक प्रकारच्या माणसाचा सहवास लाभला. या सहवासातून त्यांच्या कवी मनाने जी नोंद घेतली ती वाचक-रसिकाला एक वेगळा अनुभव देते.

रमेश मोटे यांचं जन्मगाव लाडझरी असले तरीही कर्मभूमी घाटनांदूरच. श्री सोमेश्वर विद्यालयात माध्यमिक शिक्षण घेऊन वसुंधरा महाविद्यालयाच्या प्रांगणात 'मुक्त श्वास' घेत पदवीधर झालेला हा कवी ग्रामीण जीवनाशी आपली नाळ जोडतो. माजी विद्यार्थी असलेल्या या संवेदनशिल कवीचे लेखन सामर्थ्य प्रभावित करणार आहे. महाविद्यालयाला अशा गुणी विद्यार्थ्यांबद्दल नेहमीच अप्रूप वाटले आहे. याचाच एक भाग म्हणून 'शब्दाई कविता विशेषांक-२०२१' माजी विद्यार्थी कवी रमेश महादेव मोटे लिखित एकूण ७० कवितांचा संग्रह प्रकाशित होत आहे.

या कवितासंग्रहाचे वेगळेपण त्यांच्या लेखन सामर्थ्यात दडले आहे. रानावनात भटकणारा, रानामाळातील फळा-फुलांचे, निसर्गाचे गाणे जनामनात पेरणारा हा कवी आहे. शेतकरी म्हणून आलेल्या अनुभवांना शब्दरुप देताना कवी शेतकऱ्याच्या बारकाव्यासह चित्रित करीत जातो.

कवीने 'साद', 'पेरणी', 'दुबार पेरणी', 'पोळा', 'बाजरीचा हुरडा' यासारख्या कवितेतून कृषीजीवनाचा वेध घेतला आहे. 'साद' ही कविता शेतकऱ्यांच्या दुःखी, कष्टी जीवनांची करुण कहाणी मांडते. शेतकऱ्यांच्या जीवनातील सुख-दुःखाचे काही कवितातून चित्रण येते. अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्याची भयंकर अवस्था होते. बांधावरचं जगणं प्रत्यक्ष अनुभवल्या शिवाय तिची दाहकता कळत नाही. अवकाळ गाभण्या पावसाने नद्या, नाले तुडूंब भरुन वाहायचे. बघता-बघता सगळ्या शिवारात पाणी-पाणी व्हायचे. पुरामुळे दोन-दोन दिवस वाटा बंद व्हायच्या. पावसाची ही कहाणी दादा सांगायचे. त्यातही छळणारं आभाळ, पुन्हा पुन्हा आठवत राहायचं. चिखल डेरा तुडवित काबाडकष्ट करण्याशिवाय पर्याय उरत नाही. मुला-बाळांच्या भवितव्यासाठी प्रसंगी गाव सोडून जावे लागते. उचल घेऊन ऊसतोडणीला जाणाऱ्या माणसाच्या पाचवीलाच जणू दारिद्रय पुजले आहे. मुलांची शाळा सोडून कारखान्याची वाट चालणाऱ्या मजुराची केविलवाणी अवस्था हृदयाला पीळ घालते.

या कवितासंग्रहातील अनेक कवितातून बापाच्या दुःखाचे-दारिद्रयाचे चित्रण आले आले. आयुष्यभर काबाडकष्ट करीत राबराब राबणाऱ्या बापाला मुलगा साहेब व्हावा असे वाटते. आपल्या आयुष्याचं मातेरं झालं. मुलाच्या आयुष्याचं होऊ नये, म्हणून काळजी घेतो. बापाला आशेचा किरण दिसतो. बापाचं चित्र अधिक स्पष्ट करताना कवी म्हणतो,

**''बाप माझा कारागीर**
**त्याची सांगतो मी कथा**
**नाही जमीन जुमला**
**चिखला मातीत रमला''**

'बाप (कुंभार)' ही कविता माती-चिखल थापून एक पिढी घडविणाऱ्या बापाची कर्मकहाणी मांडते. कष्टाळू बाप जगण्याला बळ देतो. कष्टाळू बापाला मायीचा हातभार होता. आईचा भूतकाळ किती भयंकर होता, याचे चित्रण 'माझी माय' मधून करताना कवी म्हणतो,

**''दोन घास मिळायला**
**लई तरसायच पोट**

सनवार कधी तरी

पुरण पोळीची भेट''

भल्या पहाटे उठून सडा सारवण करणाऱ्या मायीचं नशिबच भेगाळलेलं. सुख, ऐश-आराम कसला ते तिला ठाऊकही नाही. उलट आयुष्यभर सासुरवास सहन करीत जगावे लागे. माय ही कविता मायीच्या केविलवाण्या धडपडीचे चित्रण करते.

''ओसरुन गेलं सारं तवा

मागं राहिलं काय

चार पोरके जीव

त्यात केविलवाणी माय

डोक्यावरचे छत्र गेलं

वादळ वारा हाय हाय

पंखाखाली चिमुकल्यांना

झाकत होती माय''

डोक्यावरचे छत्र गेले की, माणसाचे आयुष्य उघड्यावर येते. चिल्या-पिल्यांना पदराखाली घेत प्रेमाचा घास चारणारी माय महान आहे. मायीची महानता, त्याग मांडताना आजी-आजोबा बद्दलचे प्रेम, माया, संस्कार आयुष्याला दिशा देते. 'बापाचा बाप', 'आजी-आज्यांच्या काळात' या कवितेतून तत्कालीन परिस्थितीचे दर्शन घडविले आहे. आजी-आजोबांच्या काळात रानमेवा सहज मिळायचा. विकत घेण्याची वेळ येत नसे. सर्व वानाची रानातच प्राप्ती होई. आता ते चित्र बदलले आहे.

कवीचे भावविश्व अधिक खुलले आहे ते प्रेम कवितेतून. निखळ प्रेमाचा अविष्कार मांडणाऱ्या अनेक कविता आपल्या 'परंतु भेटलीस पुन्हा' या कवितेतून कवी एक वेगळी अनुभूती देताना दिसतो.

''आणखी तिच्या सयीने

मी गप्पगार होतो

दिसल कधी अचानक

काळजात वार होतो''

त्याला वाटते ती नेहमीच दिसावी. तिची ख्याली खुशाली पुसावी. दोन तपाच्या

आठवणीची साठवण अस्वस्थ करते जेव्हा ती दिसते. तेंव्हा तो म्हणतो,

**''पाहून तृप्त झालो**
**बोलून शीन गेला**
**कोंडून ठेवलेला**
**हा बांध मुक्त झाला''**

दाराचा उंबरा ओलांडून तिचं येणं ही आयुष्याला उभार देते. धागे संवेदनाचे गुंफित प्रेमताचा पहिला अविष्कार मांडणारी ही कविता नव्याने सुरुवात करण्याचा ध्यास घेते. प्रेम विरह काव्य म्हणून ही कविता वेगळेपण मांडते.

पत्नी म्हणून तिचं असणं महत्वाचं आहे. घरादारातला तिचा वावर जगण्याला बळ देतो. संसार सुखाच्या बोहल्यावर आरुढ होताना तिची धिरगंभीर, अचल, त्यागी परंतु मौन बाळगणारी मूर्ती त्याला अस्थिर करुन जाते. तर संसाराच्या ओढाताणीत जगणाऱ्या तरुणाची करुण कहाणी 'गोड शब्द' मधून मांडली आहे. आई-बायकोतील वितुष्ट अनुभवत संसाराचा गाडा ढकलणारा तरुण मृत्यू पावतो तेंव्हा आर्त किंकाळी फुटते.

या कवितासंग्रहातून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारी 'अण्णाभाऊच्या साहित्यावर' ही कविता उत्कृष्ठ आहे. याशिवाय 'डॉ.बाबासाहेबांचा पाळणा' गाऊन वेगळेपण सिद्ध केले आहे. याशिवाय 'गाव-शिवेचं', 'शाळा-मास्तर', 'सेल्फीच्या धुंदीत' स्वतःला धन्य समजणारी तरुणाई, बालकविता, निसर्ग कविता, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय घटनांची साक्ष देणारी कविता. दोन पिढीतील अंतर मोजणारी खरी सत्यता मांडणारी परखड कविता लेखन करुन कवी रमेश मोटे आपले वेगळेपण मांडताना दिसतो.

वसुंधरेच्या प्रांगणात अनेक फुलं फुलली, त्यातलं हे मन आकर्षून घेणारं फुल. रानामनातील कविता घेऊन नव्या उमदीनं पुढे येत आहे. अशा गुणवंत कवीच्या या कवितासंग्रहास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**प्रा.नरसिंग श्रीरंगराव उदार**
वसुंधरा महाविद्यालय,घाटनांदूर
ता.अंबाजोगाई जि.बीड

# कवीचे मनोगत

माझ्या काव्यलेखन स्फूर्तीचे उगमस्थान मा. डॉ. मुकुंद राजपंखे सर, यांच्या लिहीत रहा बाळ! या उद्‌गाराने प्रेरित होऊन  कवितेच्या दुनियेत पाऊल ठेवलं. अंबाजोगाई, परळी आणि माझ्या परिसरातील सर्वच साहित्यिक मंडळी यांच्या सहवासात कवितेच्या जगात रमून गेलो. ''लय छान की राजेहो! ''अशी गोड प्रेरणा मा. नागनाथ बडे गुरुजींची असते. दत्ताजी वालेकर साहेब, प्रा. नरसिंग उदार सर हे माझ्या मोडक्या-तोडक्या कथा परीक्षण करून लिहिण्यास उभारी देतात. ''हे खूप छान जमलं माय! ''असं आपलेपणाचं बोलणं प्रा. डॉ.संजय खाडप सरांच असतं. डॉ. चामनर सर, भागवत काचगुंडे सर, गोविंद हाके सर, बालाजी कांबळे सर, सिद्धेश्वर इंगोले सर, केशव कुकडे सर, सत्तू जाधव सर, पितामह वराट गुरुजी आणि सर्व साहित्यिक मंडळी यांच्या सहवासात साहित्याच्या दुनियेत जगण्यातली मजाच और आहे.

''ग्रामीण मातीचा काव्य सुगंध ''हा माझा दुसरा कविता संग्रह प्रकाशित होत असताना खूप आनंद होतो आहे. विशेष म्हणजे माझ्या कॉलेजला आणि संपूर्ण गुरुजन मंडळी, मा. प्राचार्य सरांना या ग्रामीण मातीच्या कविता प्रकाशित व्हाव्यात आणि त्याचे प्रकाशन महाविद्यालयानं करावं असं वाटलं. खरं म्हणजे मी हे माझं परमभाग्य समजतो. वसुंधरा महाविद्यालयात कॉलेजला होतो तेंव्हापासून ते आजही आम्हा माजी विध्यार्थ्यांना तोच सन्मान मिळतो. मा. प्राचार्य डॉ अरुण दळवे सर, डॉ. संजय खाडप सर,  प्रा.नरसिंग उदार सर यांचं वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असतं. कॉलेजच्या माध्यमातून मी राज्यनाट्य स्पर्धेत सहभागी झालो होतो. कवितेच्या अनेक मैफिलीत सहभागी होत राहिलो. प्रा. डॉ. खाडप सर सोबत असले की अभिमानाने सांगतात की, 'रमेश माझ्या कॉलेजचा विध्यार्थी आहे'. त्यावेळी आपल्या पाठीवर खूप मोठे हात आहेत याची जाणीव होत राहते.

मागील दहा वर्षात साहित्यात वेगवेगळ्या अंगानी लिहिण्याचा बराच प्रयत्न केला. कथा, कविता, नाटक, एकांकिका यातून प्रकट होत असतानाचा आनंद मोठा आहे. मला पूर्णपणे मोकळा वेळ देऊन लिहिण्यास आणखी प्रोत्साहन देणारा माझा लहान भाऊ उमेश याचाही खूप मोठा वाटा आहे. आई-वडील आणि मला खंबीर प्रोत्साहन देणारे माझे चुलते मा. वैजनाथ मोटे,


घर परिवार, माझं गाव जिवलग मित्र तथा गावचे सरपंच शिरीष दादा या सर्वांचे आशीर्वाद पाठीशी आहेत. राज्य पत्रकार संघांचे अध्यक्ष मा. वसंतभाऊ मुंडे, माझे गुरुजी के. जी. कर्वे सर यांच्या प्रतिक्रिया पण माझ्यासाठी मोलाच्या आहेत. माझे बालमित्र आशिष, रामकिसन, बाळासाहेब, शंकर कुंभार, विष्णू तात्या आणि सर्व मित्र यांच्या सदिच्छा कायम सोबत असतात. माझ्या साहित्यावर अंतःकरणातून प्रकट होणारे माझे गुरुजी मा. डॉ राजपंखे सर, ग्रामीण कवितेला शब्दांनी फुलवणारे मा. श्रावण गिरी सर आणि माझ्या कविता कथा वाचून योग्य मार्गदर्शन करणारे मा. प्राचार्य दि. ना. फड सर यांचाही उल्लेख या ठिकाणी आवर्जून करावा वाटतो.

माझ्या कवितेवर प्रेम करणाऱ्या संपूर्ण स्नेही जणांच्या आणि वाचकांच्या हाती हा ''ग्रामीण मातीचा काव्यसुगंध'' देत असताना मनोमन आनंद होत आहे. माझे वसुंधरा महाविद्यालय आणि संपूर्ण वसुंधरा परिवाराच्यावतीने प्रकाशित होत असलेला हा ग्रामीण कवितांचा मेवा आपणा समोर ठेवत आहे....

आपलाच....
**रमेश महादेवराव मोटे**

# अनुक्रमणिका


एस.टी.फुक्कट
भेटलीस पुन्हा
तिचं येणं
डॉ.बाबासाहेबांचा पाळणा
उचल
बाप (कुंभार)
नवीन वाट
बापाचा बाप
गावाचं सलून
कष्टाळू बाप
शिनगार
आंबा उतरणी
चिखल डेरा
आजी-आज्याच्या काळात
दुबार पेरणी
घडलं..कसं घडले..
हल्ली मामाच्या गावाला जाताना
चहाचा तलाव
महाळं
नव्याने सुरुवात
मुळव्याध
सुट्टी आली
मारतीचा पार
मौन सोडा साहेब
'राज' कारण
कोरोनाचं वारं
कुत्रा
मास्तर ..!
ध्यान ठेवा माझ्याकडं
धागे संवेदनाचे
झेंडा
पोळा
बाजरीचा हुरडा
इमानी
छळणारं आभाळ
दादा सांगायचेय
वायलं
जळाले घर आमचं
तुझा निर्णय
माय
लेक शिकावी
गोड शब्द
समज
भिकारी
माझा गाव
बांधावरचं जगणं
फोटोग्राफी
अण्णाभाऊंच्या साहित्यावर
बबल्या
सांगना गं आई
कवितेचं गाव
किती वाढलं
माझी माय
लेखनीची दौड
गुरुजी
मिलनाची येळ
आशेचा किरण
चिऊ
लगीनगाठ
माझ्या घोंगडीची दशी
सेल्फी
साद
आगं माझी राणी
पंगत
साहेबासाठी
साहेब
नियमाची जत्रा



## एस. टी. फुकट

आजा म्हणे आजीला
चल जाऊ फिरायला
एस. टी. आता फुकट झाली
देवधर्म करायला

लेकं - सुना म्हणत होते,
म्हातारं पार गळून गेलं!
एस. टी. ची बातमी पाहून
दुखणं त्याचं पळून गेलं

कोवळ्या उन्हात सुपारी चघळत
म्हातारे प्लॅन करू लागले
परळी वै., चाकरवाडी
कपिलधारला फिरू लागले

काटक म्हतारी, म्हताऱ्यासंग
सीटवर बसू लागली
तारुण्यातलं भरलं सपन
आठवून आठवून हसू लागली

तब्येतीनं बरे तेवढे
आळंदी, पंढरी फिरून आले
जमल तेवढे आवाक्यातले
देवस्थानं करून आले.

## सहल

श्रावनातल्या सहलीला
मिळून सारे जाऊया
मरळ सिद्ध महादेवाचे
हिरवे डोंगर पाहूया

गावापासून मैला वरचे
ठिकाण मोठे भारी
हातामध्ये हात घेऊन
निघते प्रभात फेरी

गाणे आणि गंम्मत जम्मत
मजाच असते न्यारी
शब्दभेंड्या, कथा, कविता
साऱ्यांची होते बारी

पंगत बसते हिरव्या रानी
गोपाळांचा मेळा
हसा, बागडा तुम्ही मुलांनो
आनंदाने खेळा

## भेटलीस पुन्हा



आणखी तिच्या सयीने
मी गप्प गार होतो
दिसली कधी अचानक
काळजात वार होतो

काल गर्दीतल्या तीला मी
पाहून हात केला
थांबून पाहताना
तिचाही तोल गेला

इकडे कुठे... कशाला?
ख्याली खुशी पुसावी
केंव्हा तरी अचानक
नेहमीच ती दिसावी

बोलायचा इरादा
झाला तिचा अन माझा
दोन तपाचा होता
भरला मनात बोजा

उतारत्या वयाला
आणखी तशीच दिसली
उनाड... अल्लडाचे
हसणे तसेच हसली

पाहून तृप्त झालो
बोलून शीन गेला
कोंडून ठेवलेला
हा बांध मुक्त झाला


# तिचं येणं

एक लगीन सराई
आली चालून घरात
केळी -आंब्याच्या पानांचा
सजे मांडव दारात

कांती गव्हाळ -मधाळ
नाही कुठल्या उन्यात
पोर होती गावढाली
जशी नागीण रानात

राना -वनाच्या फुलांची
तिच्या केसात वर्दळ
माती सुपीक सुवास
तिच्या अंगाचा दरवळ

तिच्या डोळ्यात पाहिली
इंद्रधनूची कमान
सप्तरंगांच्या झोकात
चाले नाजूक दमानं



वाहे खळखळ ओढा
तिचं हसणं नितळ
सर्वांग सुंदरीच
थोडं कपाळ उथळ

तिचं येन माझ्यासाठी
पावसाळी श्रावण
माप ओलांडून केला
माझा उंबरा पावन.

# डॉ. बाबासाहेबांचा पाळणा

१४ एप्रिलला महू गावात
फुलला वसंत घराघरात
आनंद साऱ्या जगभरात.... जो बाळा..

दलित वाड्यातलं नाजूक घर
संसार बापाचा उघड्यावर
माय जोजविते बाळा बिनघोर... जो बाळा..

कर्मकांड अन भविष्यवाणी
नाही आले कधी घरा चालूनी
सावित्री मायीची हाती लेखणी.... जो बाळा..

फुले शाहुंचा वारसा घेऊन
उच्चविद्या विभुशीत होऊन
भीम आले देश विदेश पाहून...... जो बाळा..

जाती धर्माच्या रीती मोडल्या
माणुसकीच्या त्यांनी वाटा जोडल्या
दगडालाही जणू वाचा फोडल्या... जो बाळा..

काळारामाचे दार उघडले
चवदार पाण्यानं सारे जोडले
जाचक विपरीत कायदे मोडले... जो बाळा...

राज्य घटनेचे महान कामं
लिहून केला पूर्णविराम
भगवान बुध्दांचा अवतार भीम.... जो बाळा...

फुले शाहू अन बाबा जोडीला
आठवण येते घडीघडीला
तुमचा आदर्श पुढच्या पिढीला... जो बाळा..



## उचल

काल घेतली उचल
झाली निघायची घाई
डाळदाणा पायलीनं
मीठ मिरची बी घेई

उद्या पराया रानात
कोप थाटावी लागलं
पसाकुडता सोबती
चार दिसाचं भागलं

बोले लेकरास बाप
घेई दप्तर बांधून
शाळा आपली फडात
येतो मास्तरा सांगून

घरा लावलं कुलूप
उभा ट्रॅक्टर दाराला
पाच कोयत्याची जोड
पाही वळून घराला

हाती घेऊन पोटाला
चाले बिऱ्हाड देशाला
चिल्या - पिल्यांचं नशीब
उभं दारिद्र्य उशाला

## पेरणी

रान वापस्याला आले
निघे पेराया भिगीन
मुठ चाड्यावर सोडी
राजा वर्षेल अजुन

ओटी कंबर बांधून
बैल हाकारीतो राजा
तास बेरते मध्येच
आवरीतो सारा बोजा

बीज पेरता रानात
हसू फुलते मनात
एकजीव रास पडे
खोल रुतल्या फनात

अशी तिफन फिरता
तास दिसते सरळ
वर बरगाडी ढेल्यात
थोडे उडीद कारळ



# बाप (कुंभार)

बाप माझा कारागीर
त्याची सांगतो मी कथा
नाही जमीन जूमला
चिखला मातीत रमला

बाग कोंबड्याची होता
हाती फावड घेऊन
तुडवी वाट डोंगराची
भार गर्दभा देऊन

करी चिखलाचा आरा
माती चाळून मळून
त्याच्या नशीबाच चाक
दमे फिरून फिरून

घाम पिऊनिया माती
होते सजीव साकार
काळ चक्रच्या ओटीत
येतो जीवना आकार

घडा वाकडा तिकडा
करी ठोकून निटास
भाजे पेटल्या आव्यात
बसे चटके बोटास

माझ्या बापाची कला
चुल, रांजन, घड्यात
भांडी, कुंडी, लोटक्यांची
जत्रा कुंभारवाड्यात

माझ्या बापाची मिरासी
बलुत्यानं वाढवली
माती चिकूल थापून
एक पिढी घडविली.



# नवीन वाट

कंदुरीचं मटण खाऊन
पाव्हणे रावळे पसार झाले
मेव्हणे मेव्हणे दोघंच राती
जागली वरती झोपाय गेले

बेत सारा जमून आला
भेटीगाटीला कारण झाले
दोघांचबी पिकलं पान
डोळे त्यांचे भरून आले

आप्पा म्हणे तात्याला
पहिल्या तिथीला मोहर्त धर
राधा आता मोठी झाली
तिचं हात पिवळं कर

चार घरी भाकरी टाकल्या
हुंड्यासाठी कोलून गेले
पेटल्या बिडीच्या धुपनासंग
तात्या पुढं बोलून गेले

येवडं नकू लावून घेऊ
मपलं जरा ध्यानात घे
तुही राधी अन मव्हा किशा
दणक्यात लगीन लाऊन दे

हुंडाभांडा सोडून सारं
माणुसकीच धावून आली
ह्यांच्या पुढं दोन घरांना
नवीन वाट देऊन गेली

कोडं सुटलं राधीचं अन
किशाचबी गंगेत न्हालं
उरलं मटन खाऊन सकाळी
जबानीला पक्क केलं.



# बापाचा बाप

चिरबंदी हिरीवर
तीच नाडा आणि मोट
कपिलीच्या दावणीला
आज्या हाताचं चऱ्हाट


धवलवर्ण पेहराव
पालकुर डोक्यावर
आष्ठगंध भाळी दिसे
जोडा पायी करकर

ताव भारी मिशीवर
बोलायला फटकळ
आजा आतून बाहेर
पाण्यावानी नितळ

खंडीभर गायी दारी
तितकी वासरांची भर
स्वतः हाती पेटवलेले
दोन बैल डौलदार

गाडग्यानं तूप खायी
दुध–दुभत सालभर
भरल्या कणगी दारात
नसे कशाचाच घोर

गायी–गुरांचा निवारा
गोठा कोंडण परस
नऊ खण लादणीला
एका माडीचा कळस



# गावचं सलून

डोक्यावरचे केसं सुद्धा
डोकं काढू लागले
पडक वहिती धुऱ्यावरती
देठं वाढू लागले

चटाक चटाक वस्तरा
दगडावर धार धरायचा
डोकं बादलीत बुडवलं की
 तमाम करायचा

गजनी तेवढा बरा वाटतोय
सख्या भावासारखा
टकलं करून फिरण्याईतका
आनंद नव्हता बरंका

हिंडतं फिरतं सलून तवा
वट्यावरती थाटायचं
दाढी सकट डोक्यालाबी
गुडघ्यात धरून घोटायचं

पुढं धोंडा मागं धोंडा
महादू आण्णा बसायचे
तंबाकूला चुना लावून
वस्ताऱ्याला पिसायचे

गल्लीपासून दिल्लीपर्यंत
चर्चासत्र भरायचं
तंबाकूच्या चोथ्यासंग
तोंड मोकळं करायचं

हेअर कट  कट
जमाना नव्हता सुधरायचा
म्हशीसगट एकच वस्तरा
आखं गाव भादरायचा

साबणाचा फेस नव्हता
खरबड हात फिरायचा
ढेकळा मधल्या औतावानी
खरखर आवाज करायचा



## कष्टाळू बाप

पेंढी सुटली सुटली
नाही बसला रे आळा
कष्ट उपसितो बाप
ठेव आठवण बाळा

सारी रात पाणी देतो
उभा राहून गव्हात
नसे साबण तयाला
आंघोळ डव्हात

बाज तुटकी झोपाया
रोज येचन बांधतो
दोऱ्या -सुतळीन बाप
घट्ट पायतान सांधतो

खर्च भागवण्यापाई
दुध डेअरीला घालतो
ठेचा -भाकर खाऊन
गडी जोमात चालतो

## शिनगार


हिरवा पिवळा शिवार
अंगी नवती दाटली
नऊवारी पातळात
माय धरणी नटली

ज्वारी पिवळा बाजरी
तीला करते शिनगार
मेघ सोनेरी किनार
वरी घालितो पदर

दिस उघड झापीचा
तिच्या पापण्यांची चाल
खळी हिरव्या डोंगरी
जसे भिजलेले गाल

हसू निखळ सांडते
कड्या कपारीच्या धारा
वात्सल्याचा वाहे
शांत शितल हा झरा.

# आजी -आज्याच्या काळात...



आजी - आज्याच्या घराला
होती वसरी अन वटा
बांधा धुऱ्याच्या कडीन
चवळी भेंडराचा पट्टा

ओल्या पेरणीत तवा
याद आजीला व्हायची
तूर, कारळ, उडीद
मुठ चाड्याला

एक वंजळ शितूडा
तीळ, अंबाडी टाकून
मटकी, हुलग्याला ठेवी
वरच्या ढेल्याला राखून

गवळ्या काकड्या शेंदाड
मुगा चवळीच्या शेंगा
बारमाही वहायची
तवा शेतातून गंगा

भाजीपाल्यासाठी आजी
मारी शेताला चक्कर
ओली अंबाडी, बोडकी
खडकशेपू आणि पाथर

मोठ्या भेंडराच्या बीया
करी वाटून आमटी
लावी चुलीला भाकर
चव कष्टाची गोमटी

सगळा घरचा पसारा
बाजाराला तोंड
तेल अंबाडीचा घाना
त्याची गुरांनाही पेंड

## आंबा उतरणी

आमराई उतराया
वाडा जमायचा सारा
पोरीसोरी लेकुरवाळ्या
अवघा बाजार पसारा

घडं आंब्यांचे लोंबती
मन भरते पाहून
लेक सासुरवाशीन
येते पाहुणी होऊन

खूडी फिरते घडात
कंगवा केसात
फांदी होऊन मोकळी
हाले वाऱ्याच्या झोकात

गोल मासाळ आंब्याचा
खार डेऱ्यात मुरतो
झड पाणी - उनवरा
एक वरीस पुरतो

कोया कातडं दारात
गोड आंबट सुवास
आमरसाच आवतन
चुलबंधन गावास

## चिखल डेरा

मेघ गरजला गोंधळ उठला
सारे भूर.....
मुसळावानी पाऊस धारा
आला आला हो पूर...

चिव चिव बोले चिऊताई
घरट्याकडे धाव घेई
लगबगीने लांडोर बाई
आडोशाला जागा पाही

आमराईतली कोकीळ ताई
कुहू... कुहू.. गाणे गाई
ओला चिंब वानर दादा
फांदीवरती झोके घेई

शेपूट वरी ढेंगा मोठ्या
हंबरत 'पुतळी' आली
खुंट उपटून दुध प्यायची
सोन्यालाबी झाली घाई

आली आली सर आली
डबके डुबके भरून गेली
पाऊस धारा सुसाट वारा
आवती भवती चिखल डेरा





# दुबार पेरणी

बेरली.... तिफन बेरली...
पाणी झालं जास्तीच पेरणी फिरली ।।धृ ।।

पलटी केली
ढेकळाला उन्हाळपाळी
धसकटाच्या वेचणीची
बांधावर केली होळी
पळून पळून थकलो
माझी हिम्मत हरली ।।१।।

मिरगाच्या पावसान
जीव माझा गार झाला
आकडल्या आवतान
तनाचा बी मारा केला
ओलीचिंब धरणीमाय
पुरती भरली ।।२।।

उधारीच्या ऐवजानं
सोंग केले मोठे भारी
बियांनांची रास मांडी
सवाशीन ओटी भरी
ओवाळली पंचारती
उलटी फिरली

खत गेला मातीमंदी
बियाण्याला दाम नाही
शेती भाती धंद्यामधी
आता कांही राम नाही
शपथेवरी सांगतो दादा
आमची जिरली..... ।।३।।

# घडलं... कसं घडलं...



का घडलं, कसं घडलं
सारखं मला आठवत होतं !!धृ !!

नऊ वाजता भरे शाळा
दहाला आमचं आगमन
ताप आली, पोटात दुखलं
रोज नवं कारण
भदं करून पाठीचं मास्तर
रोज घरी पाठवत होतं !!१!!

धोतर हातात धरून आजा
लगेच मागं लागायचा
मरेस्तोर हाना म्हणून
मास्तरांना
शाळा भरली शाळा सुटली
पाठीवर दप्तर सतावत होतं !!२!!

घरी वैताग, शाळेत मार
कवळं मन करपून गेलं
नववी दहावी ढकलपास
दप्तर माझं हरपून गेलं
ढवात पव्हणं, मव्हळ
झाडनं
बिब्याचं गोंदण उतत होतं !!३!!

वळकी पाळकीनं चार पोरं
पेपरा दिवशी सोबत यायचे
चिठ्ठी चपाटी पुरवणाराला
खर्च पाणी द्यायचे
दोन मजली करून
दोस्त चिठ्या पाठवत होते !!४!!

पुस्तकवेडे मोठे झाले
निकाल आमचे फेल गेले
तोच चव्हाटा, तीच चर्चा
भाषणं झोडत वर्षे गेले
गळकं माळवद, तुटकी बाज
वसाड झोपडं थाटत होतं !!५!!

# हल्ली मामाच्या गावाला जाताना...

(विडंबन)

टम टम टम टम आटो गाडी
दऱ्या खोऱ्यातून रस्ता काढी
चरती गुरे पाहू या....
मामाच्या गावाला जाऊ या.........

मामाचा गाव मोठा
दारू गुटख्याच्या पेठा
आपली माणसं शोधू या.....

मामाची बायको गोरटी
रोज असते पार्टी
बळेच सामील होऊ या.......

मामाची बायको हैराण
रोज रोज भात वरण
कांदा फरसाण खाऊया......

मामाचा जीव खालीवर
घ्यावी लागेल जीन्स विजार
जुनेच कपडे लेवू या.......



# चहाचा तलाव

धोधो.. धोधो..
पाऊस पडला
पुर नदीतून
वाहत आला

गढूळलेले
वाहते
पहा पहा हो
नवल कोणते ?

डोंगर फुलला
झरा हासला
तलाव भरुनी
चहा दिसला

गर गर वारे
गार बोचरे
घरट्या मध्ये
निवांत पाखरे

नवल एक ते
तोबा तोबा
चहात नहाले
बेडूक दादा.

## महाळं

मेलेला पितर म्हणे
भादव्यात घरी येऊन जातो
पापडी, कुरडई, खीरवडी
कडी सुद्धा पिऊन जातो.

त्याच्या  पाहुण्यांचे
पाय पकाळून सुरु होतो
घरावरती पाव.... पाव..
कावळा सुद्धा जेऊन जातो

भर पंगतीत एकडाव
तुपाची धार सोडून देतात
पुंडलिक वरदा घेण्याआधी
साऱ्यांना हात जोडून होतात

लादनीवर माळवदावर
रोज पंगत बदलत राहते
बैठकीतलं पान खाऊन
अंगण वसरी रंगून जाते

रानामाळातील कामावरचे
गडीमाणसं येऊन जातात
माग राहिल्या शेतावरती
वाढणंही घेऊन



## नव्याने सुरुवात


पाहतो सुखात तुजला
गाताना मधुर गाणी
ठेवा अजून आहे
माझ्या उरात राणी

तो गाव, तो शिवार
वाहते तसेच पाणी
होऊन मुक सारे
छळती मलाच राणी

त्या गोड अंबटाच्या
मिठ्या भरून कहाणी
लिहितो खुशाल आता
मी एकटाच राणी

हा भार
वाहतो बनून ज्ञानी
बदलून टाकला मी
एकटेपणाच राणी

झाली सुरु नव्याने
माझी पुन्हा कहाणी
घरात ऐकतो मी
हिरवळ भरेल गाणी



# मूळव्याध

आठ वर्षे होऊन गेले
असह्य यातना सोसतो आहे
चार चौघात सांगता येईना
एकटा एकटा बसतो आहे


जागरण, गोंधळ, भंडाऱ्याला
लांबून रामराम ठोकतो आहे
झाड पाल्याच्या औषधाला
उपाशीपोटी चोखतो आहे

पु. ल. सारखा उपास मला
रोज रोज जाणवू लागला
मसाले  वांग्याचा
रस्सा मला खुनाऊ लागला

दवा केली, दुवा केली
पतंजली ला कोळून पेली
रात्र सारी भगभगनारी
आग मात्र नाही गेली

ऑपेरेशनच पर्याय आता
शेवटी मला उरला होता
याच महिन्यातला शनिवार
कार्यासाठी ठरला होता

आला तसा दिवस गेला
एकदाचा जाळभाज झाला
पहिल्या सारखं चमचमीत
खाण्याचा योग पुन्हा आला.



## सुट्टी आली

सुट्टी आली सुट्टी आली
दप्तर आता ठेऊया
मनासारखं नाचू, खेळू
रोज टि. व्ही. पाहूया

आली सुट्टी आली
शेता वरती जाऊया
कांदा, मिरची, लसूण, कोभी
पाणी त्याला देऊया

सुट्टी आली सुट्टी आली
अगीनगाडी बनवूया
मोकळ्या मोकळ्या आगपेट्या
खुप साऱ्या जमवूया

सुट्टी आली सुट्टी आली
जत्रेला जाऊया
बर्फगोळा, आईस्क्रिम
याची मजा घेऊया.


## मारतीचा पार

खापर पाटी, पेन्सिल तुकडा
पाऊस गाणी वाऱ्यावरची
अंगणवाडी शाळा आमची
वडाखालच्या पारावरची

पारंबीच्या झोक्यासंगे
खेळ आमचे रंगत होते
गडबड गोंधळ कालाकित्ता
शांत म्हातारे भंगत होते

पोथी कीर्तन भजनासाठी
गावाकऱ्यांचे ठिकाण भारी
सकाळ होता धडे गिरवण्या
तिथेच जमती शाळकरी

भांडण तंटे इथेच मिटले
या पराची ख्याती
न्याय देवता इथेच वसती
आनंदाची ही नगरी



# मौन सोडा साहेब

सोडा मौन साहेब आता
कांहीतरी वाटू द्या
गोरगरीब खोळंबलेत पार
लालपरी सुटू द्या

कामगारांच्या भर कष्टाचा
हक्काचा घास त्यांना द्या
उन, वारा, पाऊस, पाण्यात
खंबीर राहायचा आदर्श घ्या

सोडू नका वाऱ्यावर
त्यांनाही पंगतीत घ्या
गुरागत राबवता..... मग ;
चारापाणी तरी पोटभर द्या


उघडा डोळे साहेब आता
थोडंतरी ध्यानात घ्या
ऊस गोड आहे म्हणता पण...
मुळं तरी सोडून द्या

त्यांच्या हाती चाक आहे
एवढं बिनघोर राहू नका
सगळे बायपास त्यांनी पाहिलेत
आंत त्यांचा पाहू नका.

कारण......

पाच वर्षे आहेत तुमचे
पुढचं पाहून घेतील
बरं तर बरं नाहीतर एसटी ने
तुम्हाला परत लावून देतील...

# राज’ का रण!



पाठीवरती हात वरुन
चार दिवस चैन आहे
खिसा घेतोय भरुन
पुन्हा  वर्षे मौन आहे

वसाड पाणवठे, कुपोषित रस्ते
कोरड्या विहीरी बोंबलून गेल्या
विकासाला ह्यंडगा लावून
चौकात चर्चा उमलून आल्या

मी आमका, तु तमका!
खांद्यावर झेंडे थाटत गेले
लोकशाहीचे ठिगळं सगळे
ओढाताणीत फाटत गेले

काळ्या बॅगची ताकद एवढी
दातानं बुचनं फिरत गेले
इमानीच्या राजकारणाचे
सत्य असे झुरत गेले

छव! म्हटलं की  चावने
एवढीच आमची रीत आहे
कळवंडीला खवळत राहने
यातही काहींची जीत आहे

जिंकलेले हारात नटले
सामान्यांची काय बात आहे
चार दिवस उड्या मारल्या
आता सोयाबीनची पात आहे

गंगा वाहिली तीर्थ ठेऊन
कायम वैराशी गाठ आहे
जिंकलेल्या शेजारीच आता
हारलेल्याचेही ताट आहे

एका जिवाचे नेते सगळे
पार्टीत गळा भेट आहे
माझं, म्हणता भावांनो!
वरती सगळा समेट आहे. . .

# कोरोनाचं वारं

शहरं, वाड्या, गावं, तांडे
सगळेच बंद पाळत होते
आडबांडगे पोरं सुद्धा
घरामध्येच खेळत होते

तुझी बीडी, माझी काडी
धुपनं आता पेटत नव्हते
मुद्दाम होऊन कुणीच कुणाला
भेटत नव्हते

म्हातार्यांच्या बैठकी मोडल्या
चव्हाटय़ावर उन तापत होते
तलपखोर माणसं तेवढे
थुका गिळून झोपत होते

टपऱ्या, बार, हॉटेलावर
सोयरसुतक पडले होते
झिंगत पिंगत घरी येणारे
कायद्यापुढं नडले होते

आठवडी बाजारावर
बंद दवंडी फिरली होती
टोळक्यानं फिरणारांची
मार खाऊन जिरली होती

कच्च्या कैर्या, हुरडा पार्टी
किर्तनं, सप्ते थांबले होते
ते  तर सोडाच; पण
जमलेलेही लग्न लांबले होते



# कुत्रा

रंग माझे कितीतरी
मीठाला मी जागनारा
मालकाच्या मिरासीला
जपुनिया वागणारा

वीस नख्या शेत राख्या
आठराला भाव नाही
खेटराच्या राखनीला
माझ्या विना नाव नाही


रंग बांडा जागलीला
लाल राखी शेतमळा
गालीचा गादीवरती
लाडीवाळ हा काळा ढवळा

कुठे फोडतो शिळ्या भाकरी
गावकुसाचे हाडूक चघळी
तालेवार बंगल्यात मी
बिस्किटाच्या चळत ढासळी

हागणदारीला हुंगलेले
उकीरड्याला सांगतो मी
कळवंडीचा जोर वाढता
शेपुट घालुनी पांगतो मी

भादव्यात मी स्वैर हिंडतो
मालकाचे भान नाही
धार मी ना मारली
असे मोकळे रान नाही

# मास्तर. . . . !



तीच शाळा,  पुढचा
बारीक सारीक बदल झाले
गणिताच्या पुस्तकाला
एक मास्तर आणखी आले

रहानी होती सरळ साधी
भाषेत गावठी भरली
हा. .  हा. .  म्हणता उदगिरी
शाळेवरून फिरली

अक्राळ विक्रळ गणिताला
बळंच मास्तर डिवचत होते
थोडंफार कळन्या आधीच
खालच्या कडीला पोचत होते

सरळ वाटंच्या गणिताला
करून सोडायचे बेजार
बी. . यकं  .  अन्
बी. .  दूगनी चार!

इकडीचा हातचा. . तिकडी घ्या
तिकडीचा. .  मिसळून टाका!
कळालं तर ठीक, नाहीतर
उत्तरात घुसळून टाका

बोलणं त्यांचं हसू पेरणारं
काकरी धरून खिदळायचं
हानतो बघ!  म्हणत मास्तर
वर्गभर उधळायचं

जास्त गोंधळात आडकले की,
दात खाऊन उठायचे
हातात पडल्या लाकडानं
कडीकून मारीत सुटायचे

## धागे संवेदनांचे

पहिलं प्रेम, पहिली भेट
उन्हाळपारा घोंगत होता
ढेकळा-मातीत पाऊल तीचा
चालता चालता थांबत होता

खालून चटकं, वरुन चटकं
घामानं चिंब न्हाली होती
थोडी खुजी, मुद्रा
नजर तीची खाली होती

हर्रर.. हुर्रर.. काठी आपटून
मेंढरांना आडवत होती
माझ्या नजरेत बसल्या स्वतःला
मिश्किलीने सोडवत होती

सोळाव्याचा शिनगार तीचा
रानमाळात बहरला होता
श्रावणापेक्षाही वैशाख जणू
तरारून अंकुरला होता

उष्ण झळया, कोरडे ओठ
श्वासात वाहती आग होती
संवेदनांचे धागे गुंफले
आता तीच माझा भाग होती.



## झेंडा

जातीचा मी गुलाम आता
धर्मादारी बांधलो रे. .
निघृनतेने घात होऊनी
गावकमाणी टांगलो रे. .

हवा जसा मी कुणाकुणाला
रंगांमध्ये वाटलो रे. .
निर्दयतेच्या ओढातानीने
जागोजागी फाटलो रे. .

जातीपातीच्या पायरीला
मला धरूनी डांबले रे. .
शिगेवरुनी तळ उतरता
मला घेऊनी थांबले .

झिरझिर गल्ल्या, गाव फाटले
रंगात एकता बाटली रे. .
सहिष्णुतेच्या सागराची
निर्मळ माया आटली रे. .

मजला कुणीच आता
झेंडा म्हणू नका रे. .
वारकऱ्यांची मी पताका
जातीस ना पुकारे. .



# ध्यान ठेवा माझ्याकड

हातामधे कागदं अन
पिशवी घेऊन बगलेत
ध्यान ठेवा माझ्याकडं
अस साहेब म्हणाय लागलेत ।।धृ।।

पॅनल करून, पार्ट्या पाडून
रातोरात फिरायलेत
तोंड नाही पाह्यच त्यालाही
रामराम करायलेत
जात, धर्म, पंथ सोडून
संत बनून वागायलेत ।।१।।

पाच पन्नास,
मागपुढ दहापाच.
कामाची माणसं पाळायलेत
नोकरी विना फिरनाराला
हजार पाचशे मिळायलेत
दहा ठराव, शंभर आश्वासन घेऊन
तोंडापुरत जागलेत। ।।२।।

योजनेला सगेसोयरे
स्कीम आल्या की नातेगोते
गबाळाला भावकी
छापायला मेव्हणे
आपला शिवार हिरवा करून
दारिद्र्य रेषेखाली जगलेत ।।३।।

शेततळे पळाले,
घरकुलांनी जागा धरल्या
विहिरी फरार झाल्या
गोठ्यमध्ये येण्या
गायी तिकड चोरी गेल्या
खा.. खा.. खाऊन शेवटी
नको तिथं हागायलेत। ।।४।।

कुणाला दाखवली गाजरं
तर कुणाला देत पाले
सव्वा हात धपली ।।५।।

# पोळा



चऊर चऊर चांगभला
पाऊस आला घरला चला ।।धृ।।

पेरणी वाढली नेट संपलं
हिरव्या गवतानं गव्हाण भरली
आंबील, मुटके, रतीब आणि
सरक्या पेंडीची भरली टोपली
बैल धुवा शिंग रंगवा
गड्यानो पोळा आला ।।१।।

दुखावला तेल पाजा
तळ्यामधी पव्हनी घाला
एकदोनदा तोंड बुडवा
खोलात गेल्यास शेपुट ओढा
भरपुर खाईल, ताजा होईल
खुराकातून गुळ घाला ।।२।।

रंगीत मोरकी, कासरा नवा
शिंगामध्ये गोंडे बांधा
कपाळ भरून बाशिंग त्याला
पाठीवरती झूल घाला
खळखळ वाजत घोगरपट्टे
शिवारभरातला नंदी आला ।।३।।

उजवा येडा मारवतीला
वेशीमध्ये उभे करावे
डाल, जू,
भवती फिरवून समोर धरा
फेकीत तांदुळ बामण बोले
पाऊस आला घरला चला ।।४।।

बैलावरच्या ओवाळणीला
वाजंत्र्याची गडबड घाई
लाल, हिरवी नोट कुणी
नारळाचे खोबरे देई
एका गल्लीचा फिरुन गेला
दुसरा थाट वाजत आला ।।५।।

# बाजरीचा हुरडा



खरबाड रानची बाजरी
जशी हूरड्यात यायची
आमची जागल तवा
वरच्या माळावर जायची

उजाडलं की थवेच्या थवे
भरीव वकल गाटायचे
बिगर आवतनं फुल जेवण
कणसाला पाखरं

एका चढीत एक नंबरं
शिवार भरून फुलायचे
भरण्याआधीच कवळी कणसं
पिश्या बनून हालायचे

पाऊस पाणी कालाकित्ता
पातीला माणसं खपायचे
सर आली गळकी कोप
आडोशासाठी जपायचे

दमल्या भागल्या दुपारीला
कुटके ताक आवडायचे
ओढ्याकाठी हुरड्यासाठी
पाहून कणसं निवडायचे

आंबट ओल्या काडी काटक्या
रडत पडत जळायच्या
भाजक्या पिश्या चोळताना
गंगण्यामधून पोळायच्या

वारसुताचं  घेत
एका गोळ्यानं बसायचं
नदीकाठी काला कीर्तन
यातच सगळं दिसायचं.

# इमानी

पक्ष माझा  कोणता
मी एकदा बांधलेला
ज्या घराचा घास खातो
चाकरीस त्या सांधलेला

जात माझी कोणती
सोयऱ्याचा ठाव नाही
उकीरड्यातला जन्म माझा
कवडीचाही भाव नाही

बड्या घराचा दास होतो
मिरवीतो साखळीला
लोट धुराचा गोड वाटे
दिव्या पुढच्या काजळीला

जीव हाती घेऊनीया
राखतो मी गावकीला
इमानीच्या वचनासाठी
चावतो मी भावकीला

खांड आणि
मी फितुरी होत नाही
पदरसोड्या वेसवेचे
बाटलेले मी खात नाही



# छळणारं आभाळ

पुसट झाल्या गतकाळाला
पुन्हा पुन्हा मी आठवत राहतो
तुझ्या रोजच्या खुशालीला
सदिच्छा मी पाठवत राहतो


छळनारं आभाळ
छत्रीलाही रडवत राहत
रिपरिपणाऱ्या पावसाला
पापणी खाली दडवत राहत

काहूर माजतं, हुरहुर वाढते
तडाडून काळीज फाटत राहतं
कानशिलावर सपसप तडाखे
यातही थोड़ सुख भेटत राहतं

पुढ दलदल, माग दलदल
सगळ्या वाटा आडत गेल्या
निवाऱ्यासाठी उभारलेल्या
अर्धवट भिंतीही पडत गेल्या.



# दादा सांगायचे



आवकाळ गाभण्या पावसानं
नदाड भरून वहायचं
गावाखालच्या वड्याला
लय पाणी यायचं

आलं आलं म्हणेस्तोर
पाणी पाणी व्हायचं
आख्या शिवारावर
ढगाड रिचवुन जायचं

आऊत सुटल्या तासाला
वापसामोड व्हायची
खाराची फोड अन् भाकर
उभ्याउभी खायची

साडीवाडी पेरणीला
सगळे जण राबायचे
बेवड आणि खत घेऊन
तासावरच थांबायचे

तास फिरलं, पाऊस आलं
तिफन सुटायची
आठ दिवस झड पुन्हा
पेरणी पुढं लोटायची

पुढच्या पेरणी दिवशी पहिलं
कोळपणीला यायचं
दोणराशी वावर तवा
सम्घ्याचच व्हायचं


बांधं, धुरे चारीकडा
गच्च गवत भरायचे
वरुन थेंब खाली चिखल
त्यातही बैल चारायचे

पुर आला की दोन दिवस
वाटा बंद व्हायच्या
राणंमाळं धुवून सम्दे
कुपाट्याही वाहून जायच्या

जास्त पाऊस की,
मधून गोठा टपकायचा
पांघरलेल्या गोधडीतून
गारवा आणखी झपकायचा

# वायलं

आदळा आपट सुरू झाली
घर दचकू लागलं
बायापोरांचं घरात आता
नेहमीच खटकू लागलं



चार दिवस अंगण पारूसं
मुक होवून लोळत होतं
उष्टं खरकटं माशांसोबत
शिवनापाणी खेळत होतं

सहज मन दुखलं
इस्त्यासारखं पोळत होतं
कधी एकदा वायलं निघायचं
सगळ्या मनात घोळत होतं

शेतमाळावर, पाणवठ्यावर
चाडी चुगली पेरली गेली
गारवा ओलावा मिळता पुढे
गोष्ट भलती कांड्यावर आली

बरं झालतं पोरायचं आता!
म्हातारे कोतारे बोलत होते
आतुन बाहेरून डांबरट काटे
क्षणा क्षणाला सलत होते

करती सवरती सुत्र सगळी
पडद्या हालत होती
माझ्या सकट सगळ्या मुखी
शेतीवर बायको बोलत होती

काडी खवली, हेंडगा पेटला
घर, रान फाटत गेलं
ज्याच्या त्याच्या नशीबाचं
खापर सगळं वाटत गेलं

एक घाव दोन तुकडे
सुतळी सहीत तुटत राहीलं
ज्याचं त्याला हवंहवंसं
मोकळं पटांगण भेटत राहीलं



# जळाले घर आमच

जळाले घर आमचे इथे
पीठाला मीठ नाही
उघड्यावर पडला संसार दादा
नवराही नीट नाही ।।धृ।।

नका नेहू तुम्ही तयाला
फिरून आमचे भागत नाही
धुपतो संसार माझा त्याला
काय लागत नाही?
होतो खुशाल तुमचा
सुखाने चुल पेटत नाही ।।१।।


फेकल्या हाडकावर विकला जावा
माझा स्वाभिमान नाही
लाळ घोटितो बाटलीला
नवरा शुद्धित नाही
का बांधता बळे दावनीला
तुमची एक जुट नाही ।।२।।

मोकलुन शब्द नितीचे
जगण्यात प्रेम नाही
विकावा मतासाठी हा
परतंत्र प्राणी नाही
निस्वार्थी पवित्र मताला
इमानीचे बोट नाही ।।३।।

शब्द आता
इतिहास घेत आहे
पुढारी तुम्हा-आम्हाला
कापून खात आहे
टिकले तेच घर आजवर
ज्यांच्यात फुट नाही ।।४।।

जळाले घर आमचे इथे
पीठाला मीठ नाही.....

# माय



ओसरून गेलं सारं तवा
मागं राहिलं काय
चार पोरके जीव
त्यात केविलवानी माय

डोक्यावरच छत्र गेलं
वादळ वारा हाय हाय
पंखाखाली चिमुकल्यांना
झाकत होती माय

कष्ट तिच्या भाळी आलं
क्षणभर उभा नसे पाय
विळा आणि खुरप्यासंग
बोलत राहायची माय

लेकरंबाळ विश्व तिचं
हवं होतं दुसरं काय
काळजातल्या वणव्याला
कुरवाळत राहायची माय

सूर्य नारायण तिच्या पुढून
खाली वाकून जायचा
धडपडणाऱ्या माऊलीला
आणखी बळ द्यायचा

किती उन किती पाऊस
थंडी अंगणात यायची
मायी सोबत अभंगच्या
दोन ओळी गायची

तुळशीमाळ सखी होती
शिनभाग घालवायची
दुखलं भागलं तरी दिंडीत
पायीपायी चालवायची

देव होता पाठीराखा
थांबली नाही माय
विषवल्लीच्या वाग्बानांनी
खंगली नाही माय

फुलत होता वसंत अंगणी
बाप झाली माय
ज्ञानांमृताचे घास भरविता
अवघे विश्व झाली माय

प्रेमाचा घास सुखाचे दिस
बघत होती माय
भरल्या गोकुळात समाधानान
जगत होती माय

भक्तीप्रेमाच्या ओढीने
पायी दिंडीत गेली माय
हरिपाठाच्या भजनामध्ये
देवरुप झाली माय.



# तुझा निर्णय



मी लिलावत विकलो गेलो
तुला धक्का बसला नाही
तुझ्या संयमी काळजावरचा
दगड मला दिसला नाही

हसत राहिलीस शेवटवर
घडणाऱ्या गोष्टी घडत गेल्या
तुझ्या आसवांच्या अक्षदा
डोक्यावर माझ्या पडत गेल्या

तु मांडवात नव्हतीस पण
ऱ्हदयाला हवा तुझीच होती
हात होते दुसरेच पुढे
चूड्यात मात्र तूच होतीस

सजवून घोड्यावर बसवलेला
मी अचल पुतळा होतो
आतून तोफा डागत होत्या
चेहऱ्यावरून मोकळा होतो

मंगलवाद्ये तांडव होऊन
श्वास माझा दाबत होते
पक्वान्नाच्या पंगती मध्ये
डोळे तुलाच शोधत होते

कधी टाळलंस दूर लोटलंस
तूच मार्ग दाखवलास
माझ्यासाठी एवढा त्याग अन्
त्यागातला अश्रूही लपवलास

लपवलास सगळा एकांत
लाथाडलास सारा चैन
हसू पदरात टाकत राहिलीस
पण स्वतः च झालीस मौन

आता बोलतात भोवती कुणी
तुझ्याबद्दल बरं वाईट
पण खात्री आहे मला
तुझी चुकणार नाही वाट

तुझा निर्णय तुझी वाट
सरळ आणि रास्त आहे
खात्री आहे एकदिवस
तुझ्या एकांताचाही अस्त आहे.



# लेक शिकावी

लेक शिकावी बक्कळ
लेक शिकावी बक्कळ
तिच्या पदरी पडावी
भरल्या सुखाची वंजळ

लेक शिकावी बक्कळ
गुण सावित्रीचे यावे
एक माहेर सासर
हसू ओसंडत रहावे


लेक शिकावी बक्कळ
तीनं जिजाऊ बणून
घराघरात शिवबा
हाले पाळना जोमानं

लेक शिकावी बक्कळ
ज्योत क्रांतीची घेऊन
जशी लढली अहिल्या
काळ दुष्टांचा होवून

लेक शिकावी बक्कळ
मन खंबीर ठेऊन
उन पावसाला मात
माय रमाई होऊन

लेक शिकावी बक्कळ
हाती कायदा घेऊन
नराधम अत्याचारी
जाळ आगीन होऊन

लेक शिकावी बक्कळ
हाती कायदा घेऊन
जरी बांधला कायदा
लढ हत्यार होऊन



# गोड शब्द

संसाराच्या ओढातानीत
मनसोक्त दिलानं हसला नाही
घर जगवणारा तरूण
घरच्यांनाच निट दिसला नाही

जन्मापासून  माय त्याला
घालून पाडून बोलत राहते
विसावलेल्या आंथरूनावरही
कुपाटी त्याला सलत रहाते

लेकासोबत माय कधीच
हसत घरात बसली नाही
अर्धांगिनीच्या कर्कशापुढं
भाकर त्याला पचली नाही

भरल्या ताटावरती त्याला
माय गऱ्हानं सांगून जाते
घशामध्ये घास उतरता
मारकी म्हैस तुंबून येते

संसारातला स्वर्ग त्याला
कधीच बघता आला नाही
हातातोंडाच्या भेटीसंग
शब्द गोड झाला नाही

एके दिवशी संतापानं
निघून गेला कामावर
तिन्ही सांजेला खबर आली
प्रेत पडलंय रस्त्यावर

उर बडवत माय आता
आठवणींच ओझ घेते
बिनअक्कली बायको पुन्हा
दिवसरात्र बोंबलत राहते.

## समज

असल नसल जरी कांही
लगीन आपलं नसतानी
पुसून टाकलंय मागचं सगळं
तुझ्या सोबत बसतानी

तुझ्या संगतीत आकार धरलाय
उजाड वस्त्यांनी
एकटं पडलेलं मंदिर जोडलय
पुन्हा नव्या रस्त्यांनी

खालीवर होतो जीव माझा
घरात तु नसतानी
गजबजून जातं विश्व माझं
भरल्या घरात तु हसतानी

कधीकधी पहावं वाटतं
नकळत तुला रुसतानी
घास भरवताना मजा येते
पण, घरात कुणी नसतानी

सुपारी कशाला पाहिजे मला
साखर तोंडात असतानी
चष्मा नको लावायचा मला
शाबूत असतानी.

## भिकारी

भविष्याची नसे तमा तुज
भाकरीस हापापलेला
हात पसरून याचना ही
तु चाकरीस मुकलेला

माय बाप कुठे तुझे
घर कोणत्या वसरीला
गनगोत कोण तुझे सांग
तू वंचित भाकरीला

हे आयुष्य किती दिसाचे
त्यात हसुनी तुझे तगने
सांग बरे वाटते का तुला रे
असे भिक मागून जगने

जरी वाटली लाज
मनाला
भुकेचे गऱ्हाणे तू
सांगशील कुणाला

# माझा गाव



माझ्या गावची शाळा
महापुरुषाची वसरी
झाडाझूडपांच्या गारव्यात
गाव नांदते लाडझरी

माझ्या गावाच्या मुखाशी
गोडी सुखाची भेटेल
जुन्या गोठयातून दिसं
लिंबा गुट्टेचं हाटेल

दोन्ही बाजूच्या पवळीतून
वाट पळते चंचल
गावकुसातून दिसं
नरूबादेवाचा पिंपळ

चारं पावलाच्या आत
नाकाडे तात्यांच घरं
दोन वावेच्या आंतरी
पुढं मारतीचा

पोरं खेळायची तीथं
इटीदांडू वडाखाली
गोटया चिचूके खेळाया
सम्दया सावलीच्या गली

पुढं उजव्या हाताला
छोटं आईचं मंदिर
मजा दसऱ्यात गोंधळाला
माळ परडीचा जागर

इथं रस्त्याच्या बाजूला
नांदूरकीची छाया गार
करी आठदिसा धंदा
तिथं बसून चांभार

तेलामिठासाठी तवा
फकत तीनच ठिकाणं
संबु गुट्टे महादू काका
सदामामाचं दुकानं

माझा गाव तवा
लादणी माळवदाची वस्ती
कुडापत्रांचीच घरं
छत कुठतरी दिसती

माझ्या गावच्या मध्यात
रस्ते धावती चौफेर
दगडा धोंडयांच्या कलेत
तीथं नागोबा मंदीर

पुढं पाऊल टाकता
खाली लागतो उतार
भोळया शिवाला पुजती
माझ्या गावचे डॉक्टर

माझ्या गावाचं वैभव
महादेवाचं मंदिर
वडा पिंपळाचा भवती
गोल चक्राकार फेर



मधी लहानशी ववरी
पुढं पत्राचा मंडप
सोमवारी
बसे भवती पंगत

भवती दाट गर्द झाडी
त्याला पवळीचं कुंपण
आठादिसा सोमवारी
सनावाराला भजन

चैत्रमासात लेकमातांनी
सम्दं मंदिर भरते
भेटीगाठीत आठवणींची
जत्रा लगेच सरते

माझ्या गावाला लाभला
रानामाळांचा शिवार
हिरव्या पारव्या पालव्यांचं
असं भरलेलं माहेर

शेती भातीच्या कामासाठी
कलावंतांची मोठी भर
दासू भानू दोण सुतार
जोडीला कानघूले कुंभार

गावात पुर्वेला
आड बामनाचा जुना
पलीकडं दोण वस्त्या
सम्दा एक गावठाणा

इकडं पश्चिम भागाला
काटया धूळीतली वाट
तीन आंब्याची झाड तीथं
बाकी मोकळं खारवट

वर रस्त्याच्या पल्याड
देवा जोतीबाचं ठान
तीथं कसदार सारी
काळी माती मोकळं रानं

# बांधावरचं जगणं

सैराट सुटल्या वाऱ्यावरती
सरकारी बाता
निक्कामाल पुढं जातो
चोथा

सावकारी राक्षसाच्या
दाढेमधी सातबारा
पिकविमा वाटपाला
सरकारचा इशारा

पावसाला आळवत राहते
पोथी आणि गाथा
वटयावरच्या म्हाताऱ्यांच्या
आभाळाला लाथा

रांगेमधी गर्दीतून
पंढरपूर दिसावं
सरकारी विठ्ठलानं
जाळीतून हसावं


भर उन्हात गर्दीमधी
घामानं भिजावं
पदरी पडल्या चार नोटांना
थुका लाऊन मोजावं

कशा पेटतात चुली इथं
शहाण्यानं बघावं
बांधावरचं जगनं जरा
आपलं सांगावं.



# फोटोग्राफी

**द** रवळते दूर दिगंतर
**ता** रुण्य कुशल कलेचं
**जी** गरबाज मनाचा राजा
**वा** टीतो प्रेम दिलाचे
**ले** ऊन साज कलेचा
**क** री शोभायमान यंत्र
**र** सभरीत निसर्गाला
**घा** लीतो मोहिणीमंत्र
**ट** पोर चांदणी ही
**नां** दते स्वैर गगणी
**दु** रूनी पारखीतो
**र** जनीत सद्गुणी



# आण्णाभाऊंच्या साहित्यावर

बहरलेल्या कृष्णातीरी
मर्दानी साज
भाऊंच्या लेखनीत
वारणेचा वाघ

शाहिरीच्या साजामधी
साहित्याचा बाप
आण्णाभाऊंच्या साहित्याची जगावर छाप

इतभर पोटासाठी
पाय जागी ठरना
वस पडलं सगळं तवा
मुंबईबी पुरना
केविलवानी राघूमैना
नशिबाला शाप.. आण्णाभाऊंच्या.
इमानीच्या नावाखाली
पोट कांही भरना
काळजाच्या आगीसाठी
मसनवटा पुरंना
मढ्यालाबी
जित्यांचा धाक आण्णा भाऊंच्या

गुन्हेगारी दाढेमधी
सत्य कांही चावेना
रानोजीचं बलीदान
डोळे उघडून पाहिना
विरगती मरलाबी
सत्तेपुढं शाप आण्णा भाऊंच्या

सत्तेपुढं शहानपणा
ताकावानी घुसळला
वाघासारखा मर्दगडी
चक्रव्यूहात कोसळला
मानुसकीचे लचके तोडी
मानसाची जात आण्णा भाऊंच्या.

कोळून पेली अक्कल सगळी
नातीगोती कळंना
आहेवंच्या कपाळाला
कुंकू कांही मिळना
पळून पळून  सगळं
लागली तिला धाप
आण्णा भाऊंच्या साहित्याची जगावर छाप

## बबल्या

रोज तयाला जावे वाटे
माळावरती दूर
लिंबाखालच्या झोक्यावरती
मजा यायची फार

फुलपाखरे गायीवासरे
दोस्त तयाची सारी
हिरव्या हिरव्या गवतामधली
शिवनापाणी भारी
झुळझूळ वाहत्या झऱ्यामधलं
थंडगार पाणी
चिंचा आणि बोरासंग
आंबटगोड गाणी

धानामध्ये काकडी सापडून
रस्सीखेच व्हायची
तुला मला म्हणत सारी
वाटून वाटून खायची

मोती सोबत धावण्यात
पहिला नंबर यायचा
आज शाळा बुडवल्याचं
पार विसरुन जायचा.



## सांग ना गं आई

ना गं आई
वारं सुटलं हे कशानं
बळेच मला थोपटतेस
झोप येईल का अशानं

सोप ना रं सोन्या
आता गप्प तु गुमानं
गुडूप अंधार पडलाय
गोष्ट सांगते मी छान

सांग ना गं आई
असा आवाज का येई
गच्च दाटल्या काळोखी
असा उजेड का होई

ढोल वाजवी रे मेघराजा
नाचे विज
आली नक्षत्रांची रांग
सृष्टी सजवीण्या आज

सांग ना गं आई
थेंब पडती कुठून
चिऊताई माझी
बसली असेल का उठून

सारं कांही बाळा
तुला सांगेन सकाळी
गप्पा खुप झाल्या
आता झोपण्याची पाळी.





# कवितेचं गाव

माझ्या कवितेच्या गावा
एक समतेची वाट
गोड नितळ पाण्याचा
वाहतो बारमाही पाट

माझ्या  गाव
ओल्या आठवांच्या किनारी
नवरस अलंकार
भाषा नाजूक सुदरी

माझ्या कवितेच्या गावी
वस्ती हळव्या मनाची
सानथोर सारी एक
माझी माणसं गुणाची

माझ्या कवितेच्या गावी
घर अनेक मजली
कथा नाटक लावण्यांची
सदा मैफिल सजली

माझ्या कवितेच्या गावी
रोप अक्षर वाढते
खतपाणी जानिवांचे
सुगी जोमात जडते

माझ्या कवितेच्या गावी
नाही अन्याय
नितीमत्ता संस्कासाचा
ठेवला मुरवून खार

माझ्या कवितेच्या गावी
नाही जातधर्मपंत
एका मायीची लेकरं
धरती आकाश निवांत

माझ्या कवितेच्या गावी
नाही मंदीर मस्जिद
सर्वांठायी सर्वेश्वर
नसे कुटाळ विवाद.





# किती वाढलं

किती वाढलीया गरमी
झालं पातळ डांबर
केल्या गुदगुल्या किती
रस्ता तरीही गंभीर

किती वाढलंया मोल
दुध झालंया महाग
अख्खा साठवीला ढव
वरी मलईचे जहाज

वाढलं हो दाम
स्वस्त राशन घराला
टिप भरून रॉकेल
चकरा मारती दाराला

किती वाढला पाऊस
झाला समाधानी राजा
पाणी लागलं चुलीला
उभ्या जलमाची सजा

किती वाढलंया पिकं
कणसं हुरडयानं भरले
लोंढे पिकात दौडून
डोंब मनात शिरले

किती वाढलाया पुर
गेला शिवार वाहून
गुज मायीच्या कानात
बोले आभाळ पाहून

किती सुकाळ
भाजे चुलीला भाकर
एकाएकी सपनाचे
गळे रातीला छप्पर.

# माझी माय

जीनं जगलं कसं
माय सांगते मजला
गेली जुनाट काळात
शब्द अश्रुंनी भिजला

नाही रहायला घर
भवती दुष्काळ माजला
एक तांब्या एक वाटी
घास गोठ्यात शिजला

मोठी चांदणी निघता
सडासारवण होई
पोट लागले पाटीला
सासूरवास जिव घेई

आमच्या येळला
मधूचंद्र हानीमुन
लाज चोरट्या नजरेत
बाकी बंदीवान जीनं


नाही मिळाली तवा शेज
मऊ गार तलमाची
रानमाळ गायगोठा
खुन तुझ्या रे जलमाची



दोण घास मिळायला
लई तरसायचं पोटं
सनवार कधीतरी
पोळी पुरणाची भेट

ढोरं सुटायच्या आधी
जाई भाकर रानात
घाम पिकाच्या मुळीला
भुक भिजती पाण्यात

चिंब भिजल्या रानात
काळीज जाळते
चुल अंधारी रडते
भोग पिठात मळते.



# लेखनीची दौड

लेखनीची दौड सारी
करी पादाक्रांत सत्य
विद्या अमोघ करीते
आंधरात वास नित्य

शब्दे लऊन करती
प्रतिभेस मुजरा
हे साहित्यनायका
हिंदूराव शुरवीरा

मातीत सांडलेल्या
घामसरींचा पुर
संसार बांधतेही
सासूरवाशीन तुर

मातीत जन्म इथल्या
माथी सदैव ऋण
भरते मनात अखंड
मांजराकाठचे गुण

झाला लिखानी तुमच्या
महाल संपत्तीचा
सरत्या उन्हाळरात्री
हा पाऊस अपत्तीचा

उद्योगी मन तुमचे
कधी ना मौन झाले
कसता पडीक राने
सळसळून धान आले
कर्तुत्व हे
वरी आणिक विद्याधर
मनिषा मनात एक
उद्योगावरी सदा भर.

# गुरूजी

विवंचना भिनुन गेली
श्वासातून रक्तात माझ्या
भर्जरी कशाला उगीच
रसरशित शब्दास माझ्या

वनवा पेटला जरी उरात
राख मी होणार नाही
टक्कर देणार मी आता
गूढ़ हे आड़ ठेवणार नाही

रुसनार ना कधी मी
जीवनात हार नाही
सांगून गेली मजला
प्यार नाही

त्या गोड सावल्यांचा
शिणगार धुंद होतो
रोज मिठितल्या दाट खुनांचा
मलमली उमाळा दाटून येतो

नितळ वहाते आयुष्य माझे
करुणेस माझी भिक नाही
विचारांचा वारसदार मी
रडने आमची रित नाही



# मिलनाची येळ

ऐन अश्विन रातीला
होता काळोख साथीला
तुझ्या मिलनाची येळ
नसे चाहूल मातीला

गोण कापसाची मऊ
तुझ्या स्पर्शात भासली
ओठ ओठानं चावत
डोळा नशेत हसली

हवा गारगार
श्वास पांघरून देई
चोरकाटा अंगातला
गुंता सोडवून घेई

अशी सरीवर सर
धुंद बरसात होई
सैल सुटली दामिणी
पुन्हा कवेमध्ये घेई.

# लगीनगाठ



लगीनसराई आली तसी
घरात माझी चर्चा व्हायची
नको नको म्हणता मी पण
चर्चेत उडी घ्यायची

जवळचे लांबचे सगेसोयरे
पाहून जात होते
कुणास ठाऊक मनात काय
पण गुळणी फोडत नव्हते

शिवरातीच्या महिण्यात एकाने
शेतात फिरून पाहिलं
होकार सांगून  गेला
आता मुलगी पहायचं राहिलं


मनात लाडू फूटत होते
पोरगी पहायला जायचे
दोन दिवसातच योग जुळले
जवळून तिला पहायचे

कोपरापर्यंत मेहंदी लेवून ती
पुढ्यात येऊन बसली
गुलाब पाकळया खुलाव्या तशी
नकळतपणे हसली

सिमाउलंघन करत डोळयांची
नजरानजर झाली
दहावीपास गावरान मैना
झटक्यात पसंद केली

ऐटीत बसून आण्णा बोलले
नाव काय
लाजतलाजत दिपाली म्हणून
बोलनं तिचं थांबलं

पसंतीचा झेंडा उभारत
बैठक विसर्जन झाली
बोलाचाली तेवढी ठेवून
स्वारी परत आली



बहिण म्हणते दादाराव
कशी वाटली सांग पाहू
मनात बसली, काळजात ठसली
फोटो तीला कुठला दावू

हूंडयासाठी जिभाळया चाटत
बाप मारत होता उड्या
पाव्हणे लई रांगायलेत
मेळ जूळत नाही गड्या

बोलनं सगळं  लागलं
कुणालाच सांगता येईना
थोडी खुजी पण नटखट मैना
डोळयापुढून कांही जाईना

घास घीस करता सगळं
देण्याघेण्यात इचकलं
वरातीचं घोडं माझ्या
बसण्याआधिच बिचकलं

डोळयापुढं पिवळं सपन
हळूवार दाटून यायचं
तऱ्हेवाईक म्हतारं आमचं
दातओठ खायचं

बाशींगबळ मोठं म्हणून
महिनाभरानं निरोप आला
मिळतंजुळतं करून शेवटी
सौदा पक्का केला.

# आशेचा किरण

घायाळ होतोया
तरीही पळतो बाप
साहेब होवून घरला ये बाळा
तवाच सुखाची झोप ।।धृ।।

पहाट पाऱ्यात नदीच्या खोऱ्यात
घुंगर बैलांच्या वाजती गळयात
तोंडधुण्या पहिली खेप ।।१।।

चाकोरी करकर नजर भिरभिर
तानून धरीतो भविष्याची दोर
भागला शिनला तोल सांभाळीत
गरूडाची घेतो झेप ।।२।।

न्याहारीला सकाळी रात्रीचं शिळं
सकाळी शिजलयानं भागतो
पोत पाठीवर काळजाला पीळ अन
लागते जीवाला धाप ।।३।।

पहिल्या तारखेला लेकाला देवून
उरल्यासुरल्यात महिन्याचं घेऊन
हातात राशन आशेचा किरण
फोनात बोलतो बाप ।।४।।



# चिऊ

पावसात खेळून चिऊ आली
डोकं झालं ओलं
शिंकताना म्हणते कशी
आईस्क्रीम नाही खाल्ल ।।धृ।।

गोऱ्या गोऱ्या गालावरती
भिजके ओले केस
पापण्यांचे पक्षी तीचे
खेळत होते रेस
कुडकुडणाऱ्या पाकळीला
हळूच असू आलं ।।१।।

चिखलमाती खेळताना
कपडे झाले ओले
मऊमऊ
मोती सांडत गेले
केविलवाणी चिऊ माझी
मन झालं ओलं ।।२।।

दबक्या दबक्या पावलांची
नक्षी मांडत आली
फुललेल्या फुलाची
एकदम घडी झाली
हळूच कपडे बदलताना
मन कावरं बावरं झालं ।।३।।



# माझ्या घोंगडीची दशी

रात्र जागुन विनलिया मी
तुमच्या साठी खुशी
घोंगडीची दशी ।। धृ ।।

तुम्ही केल्या उपकाराला
उतराई होऊ
नाही घडलं लाखावारी
पसा पसा देऊ
सनवार घटकेला घरच्यावानी येऊ
तुमच्या थोरपना मधी
थोड़ी भर अशी  ।। १।।

रन रन उन्हामंदी थंडगार छाया
कुड कुड गारव्यात उबदार माया
नवरीच्या बापाची ताठ मान व्हाया
माणुसकीनं दिली तुम्ही
डोक्याखाली उशी  ।।२

रात्रभर टाळ कुटुन देव नाही पावला
महिना महिना उपासान
देह माझा वाळला
देवा तुझा ठाव मला
आता कुठ कळला
घडली मला यात्रा इथ
विश्वनाथ काशी  ।।३।।

वस पडली रानमाळ पांगली र पाखरं
दुष्काळानं हातातली पळविली भाकर
पोरकी झाली माती सारी
मोकळी वखार
आशा येळी दिली तुम्ही
आमृताची शिशी    ।।४।।



# सेल्फी

व्हाट्सअप फेसबुक सेल्फी डिपी
केसं विस्कटून वरी गॉगल
मान मुरगाळून स्टेटस ठेवतात
शहाणे म्हणावं की पागल


रात्री दहाला रांगोळी काढतात
सूर्य नारायण यांनाच दिसतो
जगाला सगळ्या झोपी घालून
ह्यांच्या सोबत कसाकाय हसतो

कधीही पहा हसत असतात
चारचौघातही माणसात नसतात
हारा फुलांचे गिफ्ट देत
रातरात जागत असतात

एक हात मोकळा सोडून
गाडीवरची सेल्फी होते
दुसरा हात वर करून
मोबाईलच्या डिपीला जाते

नजर अशी बेधुंद होते
मागचा हात खांद्यावर येतो
आंतर सगळे मिटत येते
गाडी रोडच्या खाली जाते

सेल्फी कुठे डिपी कुठे
फॉरवर्डला काय रहाते
दुसऱ्या दिवशी सगळीकडे
सेल्फीलाच श्रद्धांजली होते.



# साद

चिल्यापिल्यांचा शिरी भार
मलूल कांतेचा भ्रतार
चाले उन्हात एकटा
गायी गुरांचा आधार

दगडा धोंडयात औतशेला
कसा ठेंगाळत जातो
हात अंतरीच्या वेदनेने
रुमण्याचा सैल होतो

एका आडल्या तासाला
तास दुसरे सांधतो
तुटक्या यटनाला जीव
गाठी खेचून बांधतो

जीवाशिवाची धाव मोठी
लागत वसन
दिसं राबल्याच्या पारी
पडे अपुरी वैरण

आग काळजाची न्यारी
रडे पाळण्यात जीव
जीनं झालं बंदीवान
फक्त कुंपनात धाव

त्रान हारल्या देहाला
साद मरण घालते
फांदी खोप्याची मोडली
आत पक्षीनी रडते.



## आगं माझी राणी

तुळशीला घाल पाणी
गाय जात्यावरची गाणी
आगं माझी राणी
का करते येडयावाणी ।।धृ।।

पहाट झाली तरी तुझा
का गं उघडंना
उशीजवळ वैरी माझा
एकदाचा का बिघडंना
दिसरात येड त्याचं
पालथ्या घड्यावर पाणी ।।१।।

झुंजूमुंजू पहाटंला
शेजारचा सडा झाला
आंथरूनात रखूमाई
पांडूरंग वेडावला
आंगनात रांगोळीच्या
डोळयामधी पाणी ।।२।।

काय सांगू माझं कर्म
येडयाची झाली गत
तीन टाईम उकडून
लेकरांना देते भात
वॉट्सप फेसबुकनं
गोड लागना झालं पाणी ।।३।।

दुध भाकर भरीत
ठेच्याची चव भारी
माय तळायची मिरच्या
भवती पंगत असे सारी
तवा घरात गोकूळ
पहाटंला गोड गाणी ।।४।।



# पंगत

गावाकडच्या पंगतीचा
लई मोठा थाट
कधी संपायची पोथी तर
कधी काकड्याचा शेवट

गल्ली बोळातल्या आवतन्याला
महादूआण्णा भिडायचे
लहानथोर माणसं आमचे
प्रेमळ धाग्यानं जोडायचे

तांब्या अन पराती घेऊन
लहानथोर बसायचे
वरणाच्या फोडणीभवती
शहाणी माणसं दिसायचे

तिर्थाभवती पंगतीमधी
पोळक्या  वाढल्या जागच्या
वरणाच्या चरवीसंग
नारातात्याचा आवाज यायचा

आप्पाराव मामांच्या श्लोकासंग
वरणात भाकरी चुरायचे
लेकरं पाहुन वहाडा म्हणनारे
पाणी घेऊन फिरायचे

बदलून गेल्या पंगती आता
बुंदी आणि भात आला
वरण भाकरीच्या जेवनातला
जिव्हाळा पार दुर्मिळ झाला



## स्वार्थ

स्वार्थासाठी माणसांचे
इमान घसरू लागले
आनाभाका शपथाचे
पूर ओसरू लागले

सख्याच्या मुळावरती
सुरुंग पेरू लागले
स्वाभिमानाला काडी लाऊन
परक्या घरी फिरू लागले

मोठी माया मानाची जागा
ह्यांना सुद्धा भेटू लागली
पाटलाच्या घोड्याची
काळजी आपसूक वाटू लागली

काल झालं विसरून गेलं
पळत्याकडं धावू लागले
घर फोडून फुकट सिनेमा
चव देऊन पाहू लागले.

## साहेबांसाठी

झालं असेल तुमचं तर
आमच्याकड ध्यान द्या
ज्याच्यासाठी खुर्ची घेताय
तेच जरा समजून घ्या


मतासाठी भीक मागता
बुटसगट पाय धरून
पुन्हा तुमचीच चढाओढ
खरडून खाण्यावरून

अंदाज नका घेऊ तुम्ही
जनतेच्या कलाचा
समस्येने ग्रासलेल्या
शेतकऱ्यांच्या मुलांचा

भेट आणि आश्वासनावर
आता आम्ही भाळणार नाही
चांगला झटका दिल्याशिवाय
तुम्हाला बी कळणार नाही

गळ टाकून शिकार करणं
आतातरी सोडून द्या
मातीतल्या माणसांना
जनहितार्थ जोडून द्या.

# साहेब



हाती देऊनिया गेला
बाप मेंढराचं धन
रोज बदलितो गाव
तसं अनोळखी रानं

हाती घेऊन लेखणी
दोन अक्षर लेह्याचं
होत माझं बी सपन
मोठा साहेब व्हायाचं

नाव ठेऊन साहेब
बाप मारायचा हाक
त्याच्या डोळ्यातबी होती
माझ्या शिक्षणाची भूक

जाऊ वाटायचं रोज
पाटी घेऊन शाळत
बाप म्हणायचा तवा
तुला नाही रं कळत


गोड दिवाळी करून
तवा सोडायचं गावं
सहा महिन्यात पुन्हा
नसे शाळचं बी नाव

दिस वर्षे काढले
मेंढ्या जित्राब राखून
गावोगावीचा शिवार
आहे डोळ्यात झाकून

होत्या कोपटाच्या भिंती
जाई घाणेरी फोकाच्या
नाही बदलला काळ
डोळ्या देखत बापाच्या

वाट बघता बघता
डोळं मिटून गायब
बाप पाहुनिया गेला
माझ्या नावात साहेब





# नियमाची जत्रा

गावामध्ये जुनेपुराने
मंदिर होते झाडीमध्ये
खंबावरती मंडप आणि
फरशी होती जाडीमध्ये

नेमधारक भजनासाठी
सेवाकरते अनेक होते
झाडलोट वा फुले आनाया
गावामधले बरेच होते

रोज पूजेचा मान आप्पांना
सवंगड्यांची मर्जी होती
एकदिलाच्या माणसांची
सदोदित ही गर्दी होती

पोथीपुराण वीणा- आरती
प्रसाद वाटप नियमामध्ये
झेंडे मशाल अब्दागिरी
समईधारक कामामध्ये

गालावरती मिशा पिळूनी
मशाल हाती तळपत होती
कावड काठी हलगी संगे
दिव्य पताका झळकत होती

पालखीस ते खांदेधारक
पालकोणचे पटकेवाले
जंगी सोंगी भारूडाचे
चार दोन ते झटकेवाले

सप्ताहाच्या अखेर शेवटी
जत्रा भरते दोन दिसाची
काला कीर्तन कुस्त्या आणि
लेकमातीच्या नवसाची.